## (२) भूपाळी

उठा पांडुरंगा आता प्रभातसमयो पातला !
वैष्णवांचा मेळा गरूडपारीं दाटला ॥ १ ॥

गरूडपारापासुनी महाद्वारापर्यंत ।
सुरवरांची मांदी उभी जोडूनिया हात ॥ २ ॥

शुकसनकादिक नारद–तुंबर भक्तांच्या कोटी ।
त्रिशूल डमरू घेऊनि उभा गिरिजेचा पती ॥ ३ ॥

कलीयुगीचा भक्त नामा उभा कीर्तनी ।
पाठीमागें उभी डोळा लावुनियां जनी ॥ ४ ॥